माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये**

**दाखल झालेली तक्रार**

**रामाआ - तक्रार क्र. अम- ९१/२०२०**

"निर्णीत"

तक्रारकर्ता श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा.
रा.भोसा रोड, प्रभात नगर, राजु किराणा जवळ, ता.जि.यवतमाळ.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा.

**तक्रार सुनावणी दिनांक – ०३/११/२०२०**

तक्रारकर्ता यांनी दि.१८/०८/२०२० रोजी आयोगाचे स्तरावर कलम १८ अन्वये तक्रार दाखल करुन, अपील क्र.१५७२/२०१५ आदेश दि.१९/०१/२०१९, अपिल क्र.२१८२/२०१४ आदेश दि.०२/०२/२०१९, अपिल क्र.१०७०/२०१५ आदेश दि.०४/०४/२०१९, व अपिल क्र.२७२३/२०१६ मध्ये आदेश पारित दि.१०/०४/२०१९ नुसार पारित आदेशाचे अंमलबजावणी झाली नसल्याचे तसेच चुकीची कार्यवाही करुन कलम १९ (७) चा भंग केला आहे असे नमुद केले आहे. त्यामुळे संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम १६६ नुसार दंडात्मक कारवाई करावी व तक्रारकर्ता यांना नुकसान भरपाई द्यावी, असे निवेदन केले आहे.

प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना सुनावणीसंबंधी ई-मेल द्वारे रितसर सुचनापत्र पाठवून दि.०३/११/२०२० रोजी सुनावणीकरीता बोलावले होते. सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. श्रीमती इंदिरा अस्वार, विद्यमान उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) ह्या उपस्थित आहेत.

अपील क्र.१५७२/२०१५, २१८२/२०१४, १०७०/२०१५ व अपिल क्र.२७२३/२०१६ मध्ये दि.१९/०१/२०१९, दि.०२/०२/२०१९, दि.०४/०४/२०१९, व दि.१०/०४/२०१९ रोजी आयोगाने सुनावणी घेवून त्यामध्ये खालीलप्रमाणे आदेश दिले होते.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपिल ३० दिवसात विहीत मुदतीत निकाली काढले नाही. म्हणुन श्री.ग.वा.जाधव, श्री.अ.ज.सोनवणे, श्री.एन.के.देशमुख तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.श्रीराम पानझाडे, विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्र.केंमाअ अर्ज २००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ दि.३१ मार्च, २००८ नुसार विभागीय चौकशी सुरु

करण्याची शिफारस करण्यात येते. प्रस्तुत आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सदर आदेशाची एक प्रत प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वरिष्ठ अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलडाणा यांना पाठविण्यात यावी.

उत्तरवादी यांचा तोंडी/लेखी खुलासा व आजच्या गुगल मीट ॲपवरील ऑनलाईन सुनावणी मधुन असे निदर्शनास येते की, सबंधित अपिलार्थीने एकूण ४ माहितीचे अर्ज दाखल करुन त्यामधून ४ वेगवेगळ्या विषयावर माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्रदान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल व नंतर आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले होते. सदर द्वितीय अपिलांची आयोगाचे स्तरावर १५७२/२०१५, २१८२/२०१४, १०७०/२०१५ व २७२३/२०१६ असे क्रमांक देवून नोंदणी करण्यात आली होती व त्यावर दि.१९/०१/२०१९, दि.०२/०२/२०१९, दि.०४/०४/२०१९, व दि.१०/०४/२०१९ रोजी सुनावणी घेवून तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने दाखल केलेला प्रथम अपिल अर्ज विहीत मुदतीत निकाली काढला नाही म्हणुन श्री. श्री.ग.वा.जाधव, श्री.अ.ज.सोनवणे, श्री.एन.के.देशमुख व श्री.श्रीराम पानझाडे यांचे विरुध्द विभागीय चौकशीची शिफारस करण्यात आली होती. सदर आदेशाची अंमलबजावणी करिता एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बुलडाणा यांना देण्यात आली होती. तथापि सदर आदेशाची अंमलबजावणी उत्तरवादी यांनी केली नाही तसेच जी केली ती देखील दिशाभुल करणारी व चुकीची केली असे कारणे नमुद करुन तक्रारकर्ता यांनी आयोगाकडे तक्रार दाखल केली. आजच्या सुनावणीस तक्रारकर्ता व विद्यमान जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे खुलाश्यानुसार, आयोगाने अपील क्र.१५७२/२०१५, २१८२/२०१४, १०७०/२०१५ व अपिल क्र.२७२३/२०१६ मध्ये आदेशीत केल्यानुसार श्री.श्रीराम पानझाडे, विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही बाबत प्रस्ताव कार्यालयाचे पत्र दि.१८/०९/२०२० अन्वये आयुक्त, शिक्षण आयुक्तालय, पुणे यांचेकडे सादर करण्यात आले. तसेच श्री.ग.वा.जाधव, श्री.अ.ज.सोनवणे, श्री.एन.के.देशमुख तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी (माध्य.) हे सर्व अधिकारी आदेशाचे दिनांकापूर्वीच सेवानिवृत्त झालेले असल्यामुळे त्यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यास म.ना.से(सेवानिवृत्त) नियम १९८१ चे कलम २७ नुसार परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव दि.१८/०९/२०२० अन्वये आयुक्त शिक्षण आयुक्तालय, पुणे यांचेकडे सादर करण्यात आले. त्यावर अपिलार्थी यांनी गंभीर आक्षेप घेत असे कथन केले की, आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार उत्तरवादी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी श्री.श्रीराम पानझाडे हे वरिष्ठ अधिकारी असून यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल ) नियम १९७९ चे नियम ८ नुसार विधीवत स्वरुपात विभागीय चौकशीचा प्रस्ताव आयुक्त, शिक्षण आयुक्तालय, पुणे यांना पाठविणे आवश्यक असतांना त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल ) नियम १९७९ चे नियम १० नुसार कार्यवाही करुन शिक्षण सहसंचालक यांचेकडे पाठविले आहे.

तसेच सदर विभागीय चौकशी संदर्भात ठेवण्यात आलेल्या दोषारोपाबाबत साक्षीदारांची यादी सुध्द निरंक दाखवतात. प्रस्तुत प्रकरणी दोषी व जबाबदार अधिकारी हे पदोन्नतीच्या प्रक्रियेतून बाद होवू नये या करिता उत्तरवादी यांनी सर्व नियम धाब्यावर बसवून नियमबाह्य व बेकायदेशीरित्या संगनमत व कटकारस्तान करुन शिक्षणाधिकारी श्री.श्रीराम पानझाडे व इतर यांना वाचविण्याकरिता हे पराक्रम केलेले आहे. ही कृती अतिशय गंभीर व फौजदारीस पात्र ठरणारी आहे. प्रस्तुत प्रकरणातील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता तक्रारकर्ता यांचे कथनामध्ये तथ्य आढळून येते. सबब, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (१०) नुसार खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

१. अपील क्र.१५७२/२०१५, २१८२/२०१४, १०७०/२०१५ व अपिल क्र.२७२३/२०१६ मध्ये प्रस्तुत चारही प्रकरणी आयोगाने आदेशीत केल्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी सबंधित प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम, १९८२ चे नियम ८ नुसार प्रस्तुत आदेशापासून ३० दिवसाचे आत अधिकाऱ्यां विरुद्ध दोषारोपाचे जोडपत्र १ ते ४ तयार करून शिक्षण आयुक्त, पुणे यांचे स्तरावरुन विभागीय कार्यवाही सुरू करण्यासाठी तत्काळ प्रस्ताव पाठवावा व तसे केल्याचा अनुपालन अहवाल या आयोगास ३० दिवसात सादर करावा.

२. केंद्रीय माहितीचा अधिकर अधिनियम, २००५ चे कलम १९(१०) नुसार राज्य माहिती आयोगाने पारित केलेला प्रत्यक आदेश कलम १९(७) नुसार संबंधित सार्वजनिक प्राधिकरणावर निर्धारित वेळेत अनुपालन करण्यासाठी अंतिम व बंधनकारक आहे. जर पारित आदेशाचे अनुपालन न करून अवमान केल्यास प्राधिकरणाचे संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १६६ नुसार फौजदारी कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

**(संभाजी सरकुंडे)**
**राज्य माहिती आयुक्त, अमरावती.**

जा.क्र.त.९१/२०२०/ २२१५ /२०२१, दिनांक- 05/10/2021

प्रत :- अपिल शाखा.

१. विभागीय शिक्षण उपसंचालक अमरावती यांना माहिती व उचीत कार्यवाहीसाठी देण्यात येते.
२. शिक्षण संचालक (माध्यमिक), पुणे यांना माहिती व उचीत कार्यवाहीसाठी देण्यात येते.
३. शिक्षण आयुक्त पुणे यांना उचीत कार्यवाहीसाठी देण्यात येते. त्यांनी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडील प्राप्त प्रस्तावानुसार अपचारी अधिका-या विरुध्दची कार्यवाही सक्षम शिस्तभंग विषयक प्राधिका-याकडून आदेशात करुन घेवून अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.
४. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहिती व उचीत कार्यवाहीसाठी देण्यात येते.
५. तक्रार निवड नस्ती साठी.